**कृपया प्रसिध्दीसाठी -** **27 जुलै 2009**

### मच्छिमारांच्या प्रलंबित मागण्यांसाठी राम नाईक, प्रकाश जावडेकर यांचे पंतप्रधानांना साकडे

**मुंबई, सोमवार** : मच्छिमारांना पुन्हा डिझेल परतावा मिळावा तसेच त्यांना शेतकऱ्यांच्या दरानेच कर्ज पुरवठा व्हावा यासाठी भाजपा नेते श्री. राम नाईक व खासदार श्री. प्रकाश जावडेकर यांनी अखेर पंतप्रधानांना साकडे घातले आहे.

या संदर्भात प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात श्री. राम नाईक म्हणतात,"डिझेलच्या वाढत्या किंमतींच्या प्रमाणात मच्छिमारांना डिझेल परतावा वाढवून मिळावा यासाठी गेली दोन वर्षे कृषि मंत्री श्री. शरद पवार यांच्याकडे सातत्याने प्रयत्न करुनही दाद न लागल्याने अखेर मच्छिमारांच्या मागण्यांसाठी मी व खासदार श्री. प्रकाश जावडेकर यांनी पंतप्रधानांकडे दाद मागितली आहे."

श्री. राम नाईक यांनी सर्व प्रथम 1990 मध्ये डिझेलच्या वाढत्या किंमती लक्षात घेऊन मच्छिमारांच्या मासेमारी बोटींसाठी लागणाऱ्या डिझेलवर सवलत मिळावी अशी मागणी केली होती. त्यानुसार तत्कालीन अर्थमंत्री प्रा. मधु दंडवते यांनी प्रति लीटर 35 पैसे परतावा देण्यास सुरुवात केली होती. त्यानंतर वाजपेयी सरकारच्या काळात श्री. राम नाईक पेट्रोलियम मंत्री असताना ही सवलत प्रति लीटर रु. 1.50 पर्यंत वाढविण्यात आली होती. आता डिझेलच्या वाढलेल्या किंमती लक्षात घेऊन हा परतावा प्रति लीटर रु. 4 /- पर्यंत वाढवावा, अशी मच्छिमारांची मागणी होती. गेली दोन वर्षे मच्छिमार संघटनांसह श्री. राम नाईक कृषि मंत्री श्री. शरद पवारांकडे या मागणीचा पाठपुरावा करीत होते. कृषि मंत्र्यांनी या मागणीबद्दल परतावा रु. 3 वाढविण्याचा निर्णय केला परंतु केवळ दारिद्रय रेषेखालील मच्छिमारांनाच डिझेलवर कर परतावा देण्याचा आदेश काढल्याने मच्छिमार संतप्त झालेले आहेत. "दारिद्रय रेषेखालील मच्छिमाराकडे लाखो रुपये किंमतीची स्वतःची बोट कशी असू शकेल?" असा प्रश्न खासदार श्री. प्रकाश जावडेकर व श्री. राम नाईक यांनी पंतप्रधानांना विचारला असून कृषिमंत्र्यांना मच्छिमारांचे प्रश्न सोडवायचेच नाहीत असे आम्हाला वाटते. पंतप्रधानांनीच आता मच्छिमारांच्या समस्या सोडवाव्यात असे साकडेही त्यांनी पंतप्रधानांना घातले आहे.

गेल्या आठवड्यात पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांना सादर केलेल्या निवेदनात श्री. नाईक व श्री. जावडेकर म्हणतात, "जी गत डिझेल कर परताव्याची, तीच गत मच्छिमारांना मिळणाऱ्या कर्जाची आहे. मासेमारी ही सागरी शेतीच समजली जाते. त्यामुळे अन्य शेतकऱ्यांप्रमाणेच मच्छिमारांनाही कर्जमाफी मिळाली पाहिजे तसेच राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून (एनसीडीसी) चार टक्के दराने कर्ज मिळावे अशी मच्छिमार सातत्याने मागणी करीत आहेत. या मागणीबाबतही कृषिमंत्री श्री. शरद पवार यांनी काहीही कारवाई न केल्याने मच्छिमार नाराज आहेत. त्यामुळे पंतप्रधानांनीच आता मच्छिमारांना न्याय द्यावा."

**(कार्यालय सचिव)**